॥ खंड ०६ ॥
॥ ओवी नं. १३ ॥
॥ कृष्ण कथांमृताची निरसनसह जुनी ओवी ॥

॥ उष्टेच उष्टे ची ओवी ॥

॥ उष्टेच उष्टे अवघेच उष्टे । हरीनामी शुध्द झाले ।
हरी नामी शुध्द झाले । कौतुक पहा देवाचे ॥घृ॥०१॥
॥ सोनाराने सोन शुध्दिले/चोरले । डाग, पातकी लावले ।
मुळीच नव्हतं उष्ट रे बाप्पा । उष्ट झालं संगतीनं ॥
॥ उष्टा होता वाल्या कोळी । त्याच, दोषावर मनं ।
जिवंत माणसे मारून । सात, राजन भरले पापानं ॥
॥ मारा-मारा म्हणुन वाल्मिकी । तरला उलटया नामानं ।
मुळीच नव्हतं उष्ट रे बाप्पा । उष्ट झालं संगतीनं ॥०४॥

॥ ढिवरीन पोटी व्यास जन्मले । भागवत त्याहीनं कथले ।
उकंडया वरच उष्ट अन्न । शुक देवानं भक्षिले ॥
॥ उष्टे पात्रं दिले घोडीशी । अश्वथामा झाला तीशी ।
गाढविन पोटी गर्गाचारी । जन्मला तपेश्वरी ॥
॥ मृगा पोटी भृग जन्मला । एकशिंग त्याच्या माथ्यावरी ।
गाई पोटी गौतमऋषि । तोही जन्मला तपेश्वरी ॥
॥ अजामेळ होता पुण्यवान । ऐकावे त्याचे पुण्यं ।
उष्टी मातंगीन घरात घातली । पापाशी नाही वाणं ॥०८॥

॥ अजामेळाचे पुर्वज होते । कैलासा, पापाचे पुण्य झालें ।
तेच पुण्यं पाहुन कैलासा । अजामेळाला उध्दारले ।
॥ वाल्मिक-वशिष्ट म्हणे ऋषिचे । शोधु नये कुळं ।
नाले-खोरे गंगेत मिळाले । तेही झाले गंगाजलं ॥१०॥
भजने :- ॥ उष्टया पासुन उष्ट जन्मलं । ऐकुन घ्या हकिकतं ।
उष्टया बिना कोणी गडेहो । असेना समर्थ ॥
॥ उष्टया पासुन उष्ट जन्मलं । ऐकुन घ्या वाणी ।
इंद्र-चंद्र गणी-गंधर्व । जन्मले, महा महा मुनी ॥

॥ शुकदेव ॥

शुकदेव यांच्या जन्माची कथा अशी आहे की : जेव्हा शंकर एका वृक्षाखाली पार्वतीला अंम्वर बनण्याचे तत्वज्ञान असलेले अमर कथा सांगत होते, तेव्हा ती पार्वती कथा ऐकत हो ! हो ! म्हणता म्हणता झोपी गेली. हे पाहुन त्या वृक्ष्याच्या डहाक्यावर बसुन ती कथा ऐकत असलेला शुक पक्षि कथा संपुर्ण ऐकुन घेण्याच्या उद्देशाने, पार्वती झोपी गेल्यानंतर हो ! हो ! असे म्हणत शंकराची अमर बनन्याचे तत्वज्ञान असलेली कथा संपुर्ण ऐकुन घेतली. अमर कथा पुर्ण झाल्यावर जेव्हा शंकराला पार्वती झोपलेली दिसली, तेव्हा त्या शंकराने जाणले की : ही संपुर्ण कथा या शुकपक्षाने ऐकुन हाच पार्वती झोपल्यावर हो ! हो ! म्हणत होता. या शुकपक्षानीच अमर तत्वज्ञानाची संपुर्ण कथा ऐकलेली आहे. तेव्हा शंकराने विचार केला की : हे अमर तत्वज्ञान पक्ष्यांकरीता उपयुक्त नाही. त्याचमुळे शंकर हाती त्रिशुल घेवुन त्या शुकाला मारण्यासाठी सरसावले. शुकपक्षी जीवाच्या भितीने तेथुन सरळ पळत पळत व्यासाच्या आश्रमात प्रवेशी झाला.

तेथे त्या पक्ष्याने अत्यंत लहान रूप घेवुन व्यासजीच्या पत्नीच्या मुखाच्या आत प्रवेश केला. शंकराने जेव्हा हे पाहीले, तेव्हा त्यांनी जाणले की : हा शुकपक्षी व्यासपत्नीच्या उदरात गेल्यामुळे तो आता व्यासजीचा पुत्र बनणार. मानव रूप घेवुन तो बाहेर येईन. मानवांकरीता या अमर कथा चे तत्वज्ञान उपयुक्त असल्यामुळे, आता शुकाला मारण्याचे प्रायोजन राहीले नाही. ऐसा विचार करून शंकराने शुकपक्ष्याला जीवदान दिलेत. आणी तेथुन निघुन गेलेत.

पुढेमग शुकदेव सोळा वर्षेपर्यत मातेच्या उदरात राहीलेत. व्यासजीने बाहेर येण्यास विचारल्यास, ते तेथुनच शंकराव्दारे ऐकलेल्या अमर तत्वज्ञानाच्या आधारावर म्हणत होते की : बाहेर आल्याने तिरगुणी मायेचा प्रभाव पडतो. शुकाला उदराबाहेर येण्याकरीता सोळा वर्षे व्यासाने वारंवार विनवल्यानंतर सतराव्या वर्षि शुकदेव मायेच्या उदराबाहेर आलेत. आणी सरळ जंगलाकडे प्रस्थान केलेत. उकंडयावरचे उष्टे अन्न भक्षण करत तो विरक्त शुकदेव परमात्माची परंम भक्ती करू लागलात. चौथ्याची परंम भक्ती करत आहे. असे हे महापुरूष श्रीशुकदेवजी शंकराच्या अमर कथा च्या अमर तत्वज्ञाना व्दारे अमर बनुन अवधुत वेषात हिंडत आहे. निराकार निर्गुण निरंजन अवधुत ज्ञानाचे साक्षात स्वरूप बनुन आजही त्यांच्याजवळचे शंकरमुखचे अमर बनन्याचे तत्वज्ञान त्रिगुणातीत सच्च्या भक्ताला देत आहे. ते अंम्बर तत्वज्ञान असलेले त्रिगुणाच्या पलीकडचे ज्ञान सच्च्या भक्त योगी जनांला पाजत पाजत हा अवधुत सर्वत्र घुमत आहे. असे हे शुकदेव अवधुत ज्ञान देतात की :

॥ जितने साधन और ज्ञान हे । भक्ती सभीका फल महान है ।
स्वप्न समान जगत सब जानो । 'जगमे सुख है' यह भ्रम मानो ॥
॥ जब जग भोग विराग जागता । जब जग-सुखसे चित्त भागता ।
तब यथार्थ ज्ञान है होता । खुलता तभी शांन्तिका स्त्रोता ।
ज्ञान उदार प्रेम बन जाता । तब प्रिय नंदनॅदन मिल जाता ॥

जेव्हा जग भोग विराग पासुन जागते. जगात सुख आहे. हा भ्रम मानुन जग सुखाच्या आसक्ती पासुन आपले चित्त दुर करते, तेव्हा यथार्थ ज्ञान होते. तेव्हाच खुलते शक्तीचे स्त्रोत् आणी ज्ञान उदार प्रेम बनते व प्रिय नंदनॅदन कृष्ण ची भेट होते.

॥ व्यास ॥

महर्षि पाराशर व सत्यवती चे पुत्र असलेले व्यास हे व्दापरयुगाच्या अंतिम भागात ढिवरीन पोटी प्रकट झाला. या जाणत्या परंम् ज्ञानी पुराणपुरूषाने आपल्या सर्वज्ञ दुरदृष्टीने जाणले की : पुढे येणा-या कलयवगात मानवांची शारीरीक शक्ती, बुध्दिमती सह वेद धारण करण्याची शक्ती घटत घटत जावुन कमजोर होणार आहे. त्याचमुळे आवाजी अध्ययन करने त्यांना संभव नाही. या कारणास्तव त्यांनी तिन वेदांचे चार विभाग करून ठेवलेत. चौथ्या विभागात चौथ्या वेदाच्या भागाची फक्त वेद प्रेवेशीकाच त्यांच्याजवळ असल्यामुळे, तीचेही त्यांनी लिखाण करून चौथा वेद गुप्त आहे असे प्रसारीत केलेत. तिन वेदांवर आधारीत १८ पुराणे यांची रंचना केलीत. वेंदान्तदर्शन ची रंचना केली. या व्यतीरिक्त त्यांनी कृष्णच्या मुखाव्दारे आवाजी सांगीतलेली भगवत् गीता लिहुन ठेवली. महाभारत लीहुन ठेवले. आकारामध्ये भागवत कथले...ईत्यादी महा महा काव्ये या कवीकर्त्याने रंचुन ठेवलेत. म्हणुन तेव्हापासुन त्या परमपुरूष कृष्णव्दैपायन व्यासाला प्रथम गुरू मानुन गुरू शिष्य परंपरा चा कलयवगात प्रवेश झाला.. त्या वेद-व्यासाच्या अगोदर कोण होता गुरू ? सांगा तुम्ही.... माझा गुरूदेव आदीमुनी ! तेव्हा आलं या करन कर्ता-याच्या चित्ता ! मो-हं सृष्टी रंचावी. याहीचा हाच प्रथम शकुन निघाला होता. तो शकुन सोयंम् गुरू आणी शक्ती माता रूपात उद्भवला/प्रकटला.

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥